# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४३०/२०२३ दिनांक – १५/१२/२०२३

## वृध्द महिलेची चैन स्नॅचिंग करणा-या सराईत आरोपीतास अटक करुन जबरी चोरीचा गुन्हा २ तासात उघड
## नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

नवघर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी सौ.मालती रामतेज पाल वय-५३ वर्षे, व्यवसाय-गृहीणी, रा-रुम न २०४, अंबिका दर्शन, न्यु गोल्डन नेस्ट, भाईंदर पुर्व या दि.०८/१२/२०२३ रोजी सायंकाळी १६.५० वाजताचे सुमारास त्या राधाकृष्ण मंदिर भाईंदर पुर्व येथे पायी चालत जात असतांना बी.पी रोड, लाकडी वखारी जवळ, भाईंदर पुर्व येथे आल्या असता कोणीतरी अनोळखी आरोपी याने रिक्षातुन येवुन त्यांचे गळ्यातील सोन्याचे पेंन्डट असलेली अंदाजे १.५ तोळे वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ७३१/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३९२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने त्याची माहीती मा.वरिष्ठांना देवुन त्यांचा मार्गदर्शनाप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु केला गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक रिक्षाचालक हा फिर्यादी यांचे गळ्यातील चैन खेचुन गोडदेव नाका बाजुकडे पळुन जात असतांना दिसुन आला. सदर सीसीटीव्ही फुटेजमध्ये नमुद रिक्षाचा क्रमांक एम-एच-०४ जे.क्यु.६४७९ असा असल्याचे दिसुन आले. त्वरीत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे दोन पथक तयार करुन नमुद रिक्षाचा शोध सुरु करण्यात आला असता सदरची मो/रिक्षा ही म्हाडा बिल्डींग, इंद्रलोक, फेज-०६ येथे मिळुन आली. सदर मो/रिक्षा चालक परशुराम बाळासाहेब खुमणे, वय-२८ वर्षे, सध्याचा पत्ता- रुम नं ९०८, म्हाडा बिल्डिंग, आरबिके स्कुलच्या मागे, इद्रलोक फेज-६, भाईंदर पुर्व यास ताब्यात घेवुन त्याचाकडे तपास करता त्याचा सदर गुन्हतीतल सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हयात दि.०९/१२/२०२३ रोजी २२.३४ वा.अटक करण्यात आली होती. आरोपी याचाकडे पोलीस कोठडीदरम्यान केलेल्या तपासात त्याचे ताब्यातुन फिर्यादी यांची जबरीने खेचुन नेलेली १.५ तोळे वजनाची सोन्याची चैन तसेच गुन्हा करतांना वापरलेली रिक्षा क्र-एम-एच-०४ जे.क्यु.६४७९ असा मुददेमाल हस्तगत करण्यात आली आहे. अटक आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरोधात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहे.

१) नवघर पोलीस ठाणे गुरनं । १८५/२०१४ भादविस कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे
२) भाईंदर पोलीस ठाणे गुरनं । ११/२०१८ भादविस कलम ३८०, ४५७, ३४ प्रमाणे
३) नवघर पोलीस ठाणे गुरनं । २७३/२०२२ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.महेश तरडे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग (अति.का.नवघर विभाग), यांचा मार्गदर्शनाखाली श्री विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे पो.नि. सुशिलकुमार शिंदे (गुन्हे), स.पो.नि. संदिप पालवे, पो.उप.निरी. ज्ञानेश्वर आसबे,पो.हवा. संतोष पाटील, भुषण पाटील, सुरेश चव्हाण, पो.अं. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव यांनी केलेली आहे.



--------------ooooo--------------